International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.5 No.6 July-Aug 2018

# स्त्री हिंसाचार संबंधित मानवी हक्क आणि कायदे - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. शरद नामदेव बोरवडेकर**

*सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,*

*गोपालकृष्ण गोखले महाविदयालय, कोल्हापूर*

**प्रस्तावना :**

लिंगभाव असमानतेची समस्या केवळ भारतातच आहे असे नाही, तर अमेरिका, रशिया, जपान या सारख्या प्रगत व विकसित देशांमध्ये ही कमी अधिक प्रमाणात ही समस्या आहेच. लिंग हा नैसर्गिक गुण विशेष आहे. तर लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक गुण विशेष आहे. लिंगभाव असमानता ही समाजशास्त्रीय अर्थ असणारी संज्ञा आहे. स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये सामाजिक सांस्कृतिक दृष्टीकोनातून ज्या भिन्नता आहेत. त्या व्यक्त करण्यासाठीच या संकल्पनेचा उपयोग केला जातो. लिंगभाव एकाच आधारावर स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये सामाजिक सांस्कृतिक कर्तव्य आणि हक्काबाबत असणारी असमानतेची स्थिती म्हणजे लिंगभाव असमानता होय.

प्रस्तुत अध्ययनात लिंगभाव असमानतेमुळे स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे अध्ययन करणे हा शोध निबंधाचा उद्देश आहे.

**अध्ययनाचे उद्दिष्टे :**

लिंगभाव असमानतेमुळे स्त्रीयांवरील हिंसाचार व मानवी हक्क आणि कायदे त्यांची पार्श्वभूमी अभ्यासणे.

**तथ्य संकलनाचे तंत्र:**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतातून तथ्यांचे संकलन करण्यात आले.

**दुय्यम स्त्रोत :**

पुस्तके, अहवाल, संशोधन, नियतकालिके, वर्तमानपत्रे व इंटरनेट हे तथ्याचे दुय्यम स्त्रोत आहे.

**अ) राष्ट्रीय मानवी हक्क आयोग :**

भारत सरकारने मानवी हक्कांचे संरक्षण करणारा कायदा सन १९९३ साली संमत केला. मानवी हक्क म्हणजे 'जीवन' स्वातंत्र्य, समानता आणि व्यक्तींला सन्मानाने जगण्याचा अधिकार. हा अधिकार राज्यघटनेचे भारतीय नागरिकाला प्रदान केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर या हक्कांचे मूल्य राखले जाते. तर भारतात या हक्कांना कायद्याने संरक्षण देले आहे.

**ब) स्त्रियांसाठी राष्ट्रीय आयोग :**

१९९० च्या स्त्रियांसाठी राष्ट्रीय आयोग कायद्याप्रमाणे जानेवारी १९९२ मध्ये -स्त्रियांसाठी राष्ट्रीय आयोग स्थापन करण्यात आले. या आयोगाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1. स्त्रियांना राज्यघटनेने दिलेल्या व कायदेशीर संरक्षणात्मक तरतुदीचा आढावा घेणे.
2. कायदेशीर उपाययोजनांची शिफारस करणे.
3. गुन्ह्यांचा तक्रारी सोडविण्याची पद्धती सुलभ करणे.
4. स्त्रियांना भेडसावणाऱ्या प्रश्नाबाबत सरकारला सल्ला देणे.

**स्त्रियांसाठी राष्ट्रीय आयोगाची कार्ये :**

1. स्त्रियांना राज्यघटनेने व इतर कायद्यांनी मिळणाऱ्या संरक्षणा संदर्भातील सर्व मुद्यांचे परिक्षण व संशोधन करणे.

2. केंद्र सरकारला वार्षिक व इतर वेळेस आयोगास योग्य वाटेल त्यावेळी अहवाल, संरक्षणात्मक परिक्षण करणारे असतील.
3. अशा अहवालात संरक्षणात्मक तरतुदींची अंमलबजावणी परिणामकारक होण्याचा दृष्टिने शिफारशी करणे.
4. स्त्रियांच्या हिंसाचाराचा घटनांमध्ये दखल देणे व अशा घटना सक्षम अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणणे.

**क) महाराष्ट्र राज्य आयोग :**

स्त्रियांसाठी महाराष्ट्र राज्य आयोग हा स्वतंत्र आहे व त्याची स्थापना १९९३ च्या महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायद्यानुसार झालेली आहे. राज्य आपल्या राज्यातील स्त्रियांच्या संरक्षणासाठी आयोगाची स्थापना करू शकतात.

**राज्य महिला आयोगाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :**

1. स्त्रियांच्या हिंसाचाराचे समाजातून समुळ उच्चाटन करणे हा प्रमुख उद्देश आहे.
2. समाजातील स्त्रियांचे स्थान व मान वाढवणे.
3. समाजातील स्त्रियांच्या मानहानीकारक चालीरिती शोधून काढणे व त्या नष्ट होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.
4. स्त्रियांसाठीच्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.

**राज्य आयोगाने हाती घेतलेले कार्य :**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने विभाग ४(१) नुसार सत्यशोधक समितीची स्थापना केलेली आहे. ही समिती कोल्हापूर, सांगली, बीड, आणि सोलापूर या जिल्ह्याच्या ठिकाणच्या स्त्रियांच्या संदर्भात गुन्ह्यासंदर्भात चौकशी करेल.

१. भित्तीपत्रक स्पर्धाचे आयोजन करणे.

२. स्त्रीभ्रूणवरती चित्रपट दाखविणे.

३. संशोधन प्रकल्प तयार करणे.

अशा प्रकारचे कार्य हाती घेतलेले आहे.

**ड) हुंडा प्रतिबंध कायदा :**

भारतीय समाजातील हुंडा प्रथा समाप्त व्हावी यासाठी सरकारने १९६१ साली हुंडा प्रतिबंध कायदा केला आहे. हुंडा घेणाऱ्यांना ५ वर्षापर्यंतच्या कारावासाची आणि १५ हजार रू. पर्यंत दंड भरण्याची तरतुद कायद्यात आहे. या कायद्यामुळे हुंडा मागण्याची प्रथा बंद झाली आहे असे म्हणणे तर कमी झाले आहे.

**हुंडा पद्धती समाप्त करण्यासाठी उपाय :**

१. हुंड्याविषयी जनमत व चळवळ उभारणे.

२. लोकजागृती करणे.

३. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन.

४. स्त्री मुक्ती लढा उभा करणे.

५. स्त्री शिक्षणाचा प्रसार करणे.

६. मुलींना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनविणे.

**इ) कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध कायद्यासाठी विशाखा मार्गदर्शन १९९७ :**

सन १९९२ रोजी राजस्थानातील भंवरीदेवी वर सामुहिक अत्याचार झाला असे प्रकार थांबविण्यासाठी शासनाने प्रयत्न केले त्याचवेळी जनतेने दावा दाखल केला त्यांच्या सोबत इतर समाज सुधारक व अशासकीय संघटनाही पुढे झाल्या आणि या सर्व अशासकीय संघटनांना

(NGOs) विशाखा संबोधले जाते. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने १९९७ रोजी या केसचा निकाल दिला.

**प्रतिबंधक उपाय :**

- खाजगी कंपन्यामध्ये औद्योगिक कामगार कायदा १९४६ प्रमाणे सुचना द्याव्यात व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.
- जागृती सर्वात महत्त्वाचे जागृती होय. महिला कामगारांना त्यांचे हक्क नोटीस बोर्डावर किंवा योग्य मार्गदर्शन करून योग्यप्रकारे समजावून सांगावे जेणे करून महिला कामगार सुरूवातीपासूनच जागृत राहतील.

**ई) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा (२००५) :**

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ भारत सरकारने प्रत्यक्षात २६ ऑक्टोंबर २००६ रोजी अंमलात आणला या कायद्याचे मुख्य उद्दिष्ट असे आहे की, ज्या स्त्रिया कौटुंबिक हिंसाचाराचा बळी ठरतात. त्यांच्या हक्काचे रक्षण करणे, हिंसाचार करणारा घरातील कोणीही प्रौढ पुरूष असेल यामध्ये पती, पतीचे नातेवाईक किंवा कोणीही साथीदार इत्यादींना दोषी ठरविण्यात येईल.

**वैशिष्ट्ये :**

1. कोणतीही स्त्री की जो हिंसाचार करणाऱ्या नात्यातील आहे किंवा सोबत एकत्र राहत आहेत. त्यासंबंधी स्त्रीला संबंधीत कायद्यानुसार संरक्षण देण्यात आले आहे.
2. महिलांवरील हिंसाचार करणे अजामीनपात्र गुन्हा आहे त्यासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा किंवा २०,००० रू. दंड होवू शकतो किंवा दोन्हीही होऊ शकतो.

**संरक्षण मिळविण्यासाठी पद्धत :**

1. फौजदारी न्यायाधिशाकडे अर्ज केला पाहिजे.
2. सुनावणीची तारीख निश्चित करणे.
3. समुपदेशन केले जाते.
4. संरक्षणार्थ हुकूम देणे.

**प्रस्तुत अध्ययनाची ठळक निष्कर्ष :**

1. राष्ट्रीय महिला आयोग, राज्य महिला आयोग व स्त्रीयांवरील हिंसाचार थांबविण्यासाठी केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी होऊन सुद्धा हिंसाचारात वाढ झालेली दिसून येते.
2. लिंगभाव असमानतेमुळे वर्तमान काळात विनयभंग व सामुहिक शारीरिक अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.
3. हुंडा प्रतिबंध कायदा असून देखील वर्तमान काळात हुंड्यासाठी शारीरिक छळ, मानसिक छळ, जिवंत जाळून मारणे किंवा आत्महत्येस प्रवृत्त करणे असे प्रकार घडताना दिसून येते.
4. लिंगभाव असमानतेमुळे कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, मानसिक छळ होताना दिसून येते.
5. लिंगभाव असमानतेमुळे स्त्रींया घरगुती कौटुंबिक हिंसाचाराला त्यात पती व इतर नातेवाईक मंडळींचा हिंसाचाराला बळी पडताना दिसून येते.
6. लिंगभाव असमानतेमुळे गर्भजल चाचणीद्वारे स्त्रीभ्रूणहत्या मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते.
7. लिंगभाव असमानतेमुळे वृद्धस्त्रिया, अल्पवयीन मुलींवर सामुहिक अत्याचार होत आहेत असे दिसून येते.
8. लिंगभाव असमानतेमुळे स्त्रीयांच्या सार्वजनिक ठिकाणी छेडछाड करणे, मानसिक त्रास देणे, ॲसिड हल्ला करणे असे प्रकार वाढल्याचे दिसून येते.

9. महिलांच्या विषयी लिंगभाव असमानता कमी करण्यासाठी महिलांविषयी मानवी हक्क आणि कायदे यांचे महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

**सारांश :**

प्रस्तुत अध्ययनात केलेल्या विवेचनावरून असे दिसून येते की, लिंगभाव असमानता कमी करण्यासाठी कायद्यावरच अवलंबून न राहता समाजात जाणीव व सामाजिक प्रबोधन करून स्त्रियांना समानतेची वागणूक देण्यात यावी तरच लिंगभाव असमानता कमी होण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची :**

1. लोटे रा. ज., 'भारतीय समाज आव्हाने आणि समस्या', मनोहर पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर, दुसरी आवृत्ती, २०११.
2. शहा घनश्याम, 'भारतातील सामाजिक चळवळी', डायमंड पब्लिकेशन्स १६९१,सदाशिवपेठ टिळक रोड, पुणे २००८. मराठी अनुवाद - चिकटे प्राची.
3. समाजशास्त्र प्रा. डॉ. खडसे भा. कि, प्रकाशक, प्रथम आवृत्ती, २००९ हिमालया पब्लिशिंग हाऊस प्रा.लि., गिरगाव, मुंबई ४४०००४, प्रथम आवृत्ती, २००९.